अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

स्वायत्त

## मराठी विभाग

वर्ग- एफ.वाय.बी.ए. (प्रथम वर्ष कला)

विषय -आधुनिक मराठी साहित्य व व्यावहारिक मराठी

विषय कोड -MAR1201

सत्र - दुसरे

## प्रश्नसंच

---

**प्र.१ला. पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. 'काव्यातील आई कुठे गेली?' या शिर्षकाचा लेख 'रूपरेषा' मध्ये कोणी प्रसिध्द केला?

२. आई आणि अपत्यांचे नाते कसे असते?

३. संस्कृतीचा कितीही विस्तार झाला वा परिवर्तन झाले तरी कोणते नाते बदलत नाही?

४. माणूस आपल्या जन्माबरोबर कोणती तीन नाती घेऊन जन्माला येतो?

५. 'मायलेकंर' हा दीर्घ कवितासंग्रह कोणी लिहिलेला आहे?

६. 'श्यामची आई' ही कादंबरी कोणी लिहिली आहे?

७. रविकिरण मंडळातील कोणत्या कविने 'आईची आठवण'ही कविता लिहिलेली आहे?

८. भूमी तथा पृथ्वीला महामाता असे का संबोधतात?

९. मूळ वेदात स्त्रीचे महत्त्व प्रतिपादन करणारे संस्कृत सुभाषित कोणते?

१०. मराठी भाषेत 'आई' या विषयावर कविता लिहिणाऱ्या कोणत्याही सहा कवींची नावे लिहा.

११. 'माझी आई'ही नारायण सुर्वे यांची कविता त्यांच्या कोणत्या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे?

१२. नारायण सुर्वेची 'आई' दसऱ्याच्या आदल्या दिवशी मुलांना कुठे घेऊन जात असते?

१३. सुहासिनी इर्लेकर यांना घराचं नंदनवन झाल्यासारखं कधी वाटतं?

१४. ना. धो. महानोर यांची 'आई' ही कविता त्यांच्या कोणत्या कविता संग्रहातून घेतलेली आहे?

१५. नामदेव ढसाळांचा बाप कुठे काम करायचा?

१६. 'धरत्रीले दंडवत' ही कविता कोणाची आहे?

१७. बहिणाबाई चौधरी यांच्या कविता कोणी प्रसिध्द केल्या?

१८. आनंद यादव देवाकडे कशासाठी प्रार्थना करतात?

१९. विठ्ठल वाघ यांच्या कवितेतील 'अखाळीले' या शब्दाचा अर्थ काय आहे?

२०. चंद्रभागेच्या आंघोळीचे समाधान विठ्ठल वाघांना आपल्या शेतातील कोणत्या आंघोळीने मिळते?

२१. संत विष्णुदास 'रेणुका माऊलीला' कशाची उपमा देतात?

२२. 'होता शिवबा समई, वात होती जिजाबाई' ही ओळ कोणाच्या कवितेतील आहे?

२३. 'माझा मऱ्हाठाचि बोलु' ही कविता कोणाची आहे?

२४. ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय होते?

२५. 'जननी आणिक जन्मभूमि' या कवितेचे कवि कोण आहेत?

**प्र.२रा.अ – लघुत्तरी प्रश्न.**

१. ना. धों. महानोरांच्या आईचे दारिद्रयाशी कसे अतुट नाते होते?

२. आईच्या दु:खाचे वर्णन ना. धों. महानोर यांनी कसे केलेले आहे?

३. वामन निबांळकर यांच्या आपल्या 'माय'या कवितेतून गरीब, कृश आईचे चित्रण कसे आलेले आहे?

४. वामन निंबाळकर बाजारात कोणी कृश मोळीवाली दिसताच तिची मोळी का विकत घेतात?

५. फ. म. शहाजिंदे यांची आई 'आंबलेली अंधश्रध्दा' कशाप्रकारे शाबूत ठेवते ते लिहा?

६. नामदेव ढसाळ यांचे विस्थापित आईबाप मुंबईला आल्यावर कशा प्रकारे जीवन जगतात, ते त्यांच्या 'आई' या कवितेच्या आधारे लिहा.

७. 'जनरेशन गॅपच्या' नावाखाली आईपासून अलिप्त होणाऱ्या मुलाची व्यथा अरूण काळे यांनी 'आईसाठी' या कवितेतून कशाप्रकारे व्यक्त केलेली आहे?

८. अठराविश्व द्रारिदयातही उत्तम कांबळे यांची आई आपला संसार कसा तोलून धरते, ते लिहा.

९. विठ्ठल वाघ आपल्या शेतामध्येच विठ्ठल कसा अनुभवतात ते लिहा.

१०.विठ्ठल वाघ यांना आपल्या शेतात विठ्ठल, पंढरी, वारकरी यांची कशी प्रचिती येते, ते त्यांच्या 'वावर' या कवितेच्या आधारे लिहा.

११.प्रकाश अंभोरे यांनी 'माझी सावित्री माउली' या कवितेतून सावित्रीबाईंचा संघर्ष कसा मांडलेला आहे?

१२.दीन दलितांसाठी 'बाबासाहेब आंबेडकर' सुर्य झाले असे कवी यशवंत मनोहर का म्हणतात ते लिहा.

१३.बहिणाबाई चौधरी यांच्या धरत्रीले दंडवत या कवितेचा आशय स्पष्ट करा.

१४.वि. दा. सावरकर यांच्या 'सागरास' या कवितेतून मातृभाषेविषयीच्या अभिमान कशा प्रकारे व्यक्त झाला आहे, ते लिहा.

१५.कवी सुरेश भट यांनी मराठी भाषेचे वर्णन कशाप्रकारे केलेले आहे?

१६.वि. दा. सावरकर 'सागरास' कोणते गाऱ्हाने सांगतात.

१७.संत विष्णुदास रेणुका माऊलीला पदराने वारा का घालतात?

१८.ना. धो. महानोर यांच्या कवितेतील आई अपरात्री ऊठून काय करायची?

१९.विठ्ठल वाघ यांच्या 'वावर' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

२०.प्रशांत मोरे यांच्या 'जिजाऊ' कवितेचे रसग्रहण करा.

**ब. – टीपा दया.**

१. कवी यशवंतांची आई.

२. नामदेव ढसाळांच्या 'आई' कवितेतील बाप

३. कवी अरूण काळे यांनी मांडलेला 'जनरेशन गॅप'

४. उत्तम कांबळेंच्या कवितेतील गरीब माऊली

५. 'माती झाली माय' इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेचा आशय.

**प्र.३रा. दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. कवी यशवंत आपली आई या जगात नाही, या जाणीवेने कसे व्याकुळ होतात. ते त्यांच्या 'आई' या कवितेच्या आधारे लिहा.

२. 'सबंध आयुष्याचे पीठ झालेलं....' असं आपल्या आईच्या संदर्भात ना. धों. महानोर का म्हणतात, ते त्यांच्या 'आई' या कवितेच्या आधारे लिहा.

३. नामदेव ढसाळांच्या लहानपणीच्या विदारक आठवणी त्यांच्या 'आई' या कवितेतून कशा प्रकारे आलेल्या आहेत, ते साधार लिहा.

४. 'मातृपंचक' या काव्यसंग्रहातील 'जन्मदात्री आई' विषयीच्या भावना कशा व्यक्त झालेल्या आहेत ते कवितांच्या आधारे सविस्तर लिहा.

५. 'मातृभूमी' या विभागातील कवींनी आपल्या काव्यातून मातृभूमी विषयीचे प्रेम कसे व्यक्त केलेले आहे?

६. 'दैवत माऊली' या गटातील कवितांमधून आपापल्या दैवतांविषधी श्रध्दाभाव कवींनी कसा व्यक्त केलेला आहे, साधार लिहा.

७. 'मातृभाषा'या गटातील कवितांमधून मातृभाषेविषयीचा अभिमान व प्रेम कवींनी कशाप्रकारे व्यक्त केलेले आहे, ते कवितांच्या आधारे लिहा.

८. 'काळी आई' या गटातील कवितांमधून ग्रामदर्शनाची कोणती वैशिष्ट्ये अधोरेखित होतात, ते सविस्तर लिहा.

९. 'मातृपंचक' मधील 'मातृभाषा' या विभागातील कवितांमधून मातृभाषेची थोरवी कशाप्रकारे स्पष्ट केलेली आहे ते साधार लिहा.

१०. 'मातृपंचक' मधील 'काळी आई' या विभागातील कवितांचा परिचय करून दया.

## व्यावहारिक मराठी

**प्र.४था.अ – पुढील प्रश्नांची १५० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. भाषेची प्राथमिक कौशल्ये कोणती, ती सांगून त्यांचा सविस्तर परिचय करून द्या.

२. भाषेचे वाचन कौशल्य व लेखन कौशल्य व्यक्तीच्या विकासासाठी कसे आवश्यक आहे ते लिहा.

३. भाषण आणि संभाषण यातील साम्यभेद सविस्तरपणे स्पष्ट करा.

४. भाषण आणि संभाषण यातील भेद स्पष्ट करा.

५. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त विकासात भाषेच्या प्राथमिक कौशल्याची कशी आवश्यकता आहे, ते लिहा.

**ब – अवांतर (अभ्यासक्रमाशी संबंधित) :**

१. तुम्हाला आवडणाऱ्या कोणत्याही एका कार्यक्रमाची कार्यक्रमपत्रिका तयार करा.

२. एखाद्या कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय करून देताना कोणती काळजी घ्यावी?

३. एखाद्या कार्यक्रमाचे आभार मानताना कोणती खबरदारी घ्यावी?

४. अध्यक्षीय मनोगत कसे असावे?

५. सूत्रसंचालकाकडे कोणते गुण असावेत?

**क – सारांश लेखन :**

तुम्हाला दिलेल्या उताऱ्याचे एकतृतियांश सारांश लेखन करावयाचे आहे.

**प्र.५था. वस्तुनिष्ठ प्रश्न.**

१. 'कव्यातील आई कुठे गेली?' या शीर्षकाचा लेख कोणी लिहिलेला आहे?

अ) राम गणेश गडकरी ब) वि. वा. शिरवाडकर क) ह. ना. आपटे ड) वि. स. खांडेकर

२. 'सायरनचे शहर' हा काव्यसंग्रह कोणत्या कवीचा आहे?

अ) अरूण काळे ब) फ. म. शहाजिंदे क) नामदेव ढसाळ ड) नारायण सुर्वे

३. खालीलपैकी कोणते कवी 'दलित पँथर'या संघटनेचे एक प्रवर्तक म्हणून ओळखले जातात?

अ) वि. दा. करंदीकर ब) वामन होवाळ क) वामन निंबाळकर ड) नामदेव ढसाळ

४. 'या सत्तेत जीव रमत नाही' हा कविता संग्रह कोणत्या कवीचा आहे?

अ) वामन निंबाळकर ब) कवी यशवंत क) नामदेव ढसाळ ड) बा. सी. मर्ढेकर

५. निसर्गावर, ग्रामजीवनावर, लोकसाहित्यावर प्रेम करणारा कवी म्हणून कोणास ओळखले जाते?

अ) ऐश्वर्य पाटेकर ब) नारायण सुर्वे क) मंगेश पाडगांवकर ड) ना. धों. महानोर

६. 'मायमाती' ही कविता कोणत्या कविची आहे?

अ) ऐश्वर्य पाटेकर ब) इंद्रजित भालेराव क) आनंद यादव ड) निरजा

७. 'मातृपंचक' या संपादित काव्यसंग्रहाचे संपादक कोण आहेत?

अ) डॉ. प्रकाश अंभोरे व डॉ. अरूण काळे ब) डॉ. उत्तम कांबळे व डॉ. आनंद यादव

क) डॉ. संदीप सांगळे व डॉ. सुधाकर शेलार ड) डॉ. स्नेहल तावरे व डॉ. वेदश्री थिगळे

८. 'गर्भ धरणीचा' ही कविता कोणत्या कवीची आहे?

अ) बहिणाबाई चौधरी ब) आनंद यादव क) विठ्ठल वाघ ड) फ. मु. शिंदे

९. ‘‘लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी.....’’ या ओळी कोणत्या कवीच्या कवितेतील आहेत?

अ) मंगेश पाडगांवकर ब) कवी यशवंत क) सुरेश भट ड) बालकवी

१०. ‘हंडाभर चांदण्या’ ही एकांकिका कोणी लिहिलेली आहे?

अ) किरण नगरकर ब) दत्ता पाटील क) दत्ता भगत ड) संजय पवार

११. ‘आई एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं....’

अ) फ. मु. शिंदे ब) फ. म. शहाजिंदे क) पु. शि. रेगे ड) ग. ह. पाटील

१२. वेदांमध्ये प्रमुख माता कोणाला माणलेले आहे?

अ) पार्वती ब) नर्मदा क) आदिती ड) गंगा

१३. ‘मायलेकरं’ हा दीर्घकवितांचा संग्रह कोणत्या कवीचा आहे?

अ) नागनाथ कोत्तापल्ले ब) कवी यशवंत क) आनंद यादव ड) रामदास फुटाणे

१४. मानवी जीवनात आदिम, जैविक आणि निखळ प्राकृतिक असे नाते कोणते?

अ) मातेचे ब) देवाचे क) आदर्शाचे ड) रचत्वाचे

१५. ‘मातृपंचक’ या संपादित काव्यसंग्रहात किती कविता समाविष्ट आहेत?

अ) २० ब) २५ क) ३० ड) ३५

१६. खालीलपैकी कोणत्या कवीला ‘महाराष्ट्र कवी’ म्हणून संबोधले जाते?

अ) कवी बी ब) राम माधव क) भा. रा. तांबे ड) कवी यशवंत

१७. खालीलपैकी कोणता काव्यसंग्रह नारायण सुर्वे यांचा नाही?

अ) जाहीरनामा ब) भुईशास्त्र क) माझे विद्यापीठ ड) सनद

१८. वामन निबांळकरांची आई कोणते काम करत असे?

अ) शेती ब) शिलाईकाम क) स्वंयपाकी ड) मोळीवाली

१९. फ. म. शहाजिंदे यांच्या आईच्या मते त्यांचे कुल कोणते होते?

अ) भीष्माचे ब) रावणाचे क) द्रौपदीचे ड) कान्होपात्रेचे

२०. फ. मुं. शिंदे यांच्यामते आई काय असते?

अ) काशी विश्वेश्वर ब) प्रतिपंढरपूर क) गजबजलेलं गांव ड) तिर्थस्थळ

२१. नारायण सुर्वे यांचे वडील कोठे कामास होते?

अ) छापखान्यात ब) दवाखान्यात क) खाटीकखान्यात ड) कारखाण्यात

२२. नारायण सुर्वेच्या आईने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी काय पुजलं?

अ) सोनं ब) पैसा क) धान्य ड) दारिद्रय

२३. ‘माझी गरीब माऊली’ ही कविता कोणी लिहिलेली आहे?

अ) उत्तम कांबळे ब) प्रकाश शेवाळे क) दत्ता पोतदार ड) यशवंत मनोहर

२४. खालीलपैकी कोणता काव्यसंग्रह इंद्रजित भालेराव यांचा नाही?

अ) पीकपाणी ब) आम्ही कबाडाचे धनी क) पेरा ड) पळसखेडची गाणी

२५. शेतकऱ्यांचे दुःख, कळ, शोषण आपल्या कवितेतून खालीलपैकी कोणत्या कवीने मांडले?

अ) इंद्रजित भालेराव ब) बालकवी क) यशवंत मनोहर ड) कवी ग्रेस

२६. ऐश्वर्य पाटेकर यांची आई कधी हंबरडा फोडते?

अ) गाय मेल्यावर ब) मंगळसूत्र हिरावून घेतल्यावर

क) वडिलांनी मारल्यावर ड) माती हिरावून घेतल्यावर

२७. संत तुकारामांचे पूर्ण नांव काय आहे?

अ) तुकाराम महादु खिळे ब) तुकाराम बंडू हिवरे

क) तुकाराम बोल्होबा मोरे ड) तुकाराम संपत खोटे

२८. सावित्रीबाई फुले कशाची पाटी करून शिकल्या?

अ) खापराची ब) पिंजऱ्याची क) पत्र्याची ड) भुईची

२९. कवी यशवंतांच्या मते सुर्य मेलेल्या माणसांसाठी कोण सूर्य झाले?

अ) नेताजी पालकर ब) छ. शिवाजी महाराज क) शाहु महाराज ड) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

३०. सोपानदेव चौधरी यांनी कुणाच्या प्रेरणेमुळे संतकवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कविता प्रकाशित केल्या?

अ) आचार्य अत्रे ब) पु. ल. देशपांडे क) आण्णा भाऊ साठे ड) संत तुकाराम

--------------------